स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड विद्यापीठाच्या
सामाजिक शास्त्रे विद्याशाखेअंतर्गत इतिहास विषयातील
पीएच. डी. पदवीकरीता सादर करावयाचा

संशोधन आराखडा

भीमा कोरेगावची लढाई : एक चिकित्सक अभ्यास

संशोधक
सिध्दार्थ विठ्ठलराव मस्के
(एम.ए.बी.एड, सेट)

मार्गदर्शक
डॉ.यु.सी.राठोड
संशोधन मार्गदर्शक व इतिहास विभाग प्रमुख
नुतन महाविद्यालय, सेलु
जि. परभणी

भीमा कोरेगावची लढाई : एक चिकित्सक अभ्यास

1.प्रस्तावना

भारताच्या राजकीय व सामाजिक इतिहासामध्ये भीमा-कोरेगावच्या लढाईला अनन्यसाधारण महत्व आहे. या लढाईचा सर्वात महत्वाचा परिणाम म्हणजे पेशवाईचा अस्त होवुन मुंबई प्रांत ब्रिटिश साम्राज्याकडे आला. ज्या हिंदवी साम्राज्याची स्थापना छत्रपती शिवाजी महाराजांनी केली ते मराठा साम्राज्य 1 जानेवारी 1818 ला पेशव्यांच्या हातुन नष्ट झाले. पेशव्यांचा पराभव झाला आणि ब्रिटिशांची सत्ता मुंबई प्रांतावर प्रस्तापित झाली. हा आहे इतिहास जो इतिहासकारांनी इतिहास लेखन करुन विविध साधनांचा परामर्श घेवुन हा इतिहास समोर आणला. त्यामध्ये विशेषतः बखर साहित्य ,ब्रिटिशकालीन कागदपत्रे,ब्रिटिश रेसिडेन्सीचे पत्र व्यवहार इत्यादी साधनांचा वापर केला, परंतु या लढाईची दुसरी बाजु जी दुर्लक्षित केली ती म्हणजे 28000 पेशवा सैनिक विरुध्द 500 महार बटालियन, सेकंड बटालियन फर्स्ट रेजिमेंट बॉम्बे नेटीव्ह इन्फंट्रीने पेशव्यांना युध्दात मात दिली. अतिशय प्रतिकुल परिस्थितीमध्ये एवढया मोठया पेशव्यांच्या फौजेचा सामना महार रेजिमेंटच्या निवडक शिपायांनी केला, ही गोष्ट म्हणजे अनाकलनीय वाटु शकते. तेव्हा या प्रतिकुल परिस्थितीचा विचार करता या विषयावर संशोधन व्हावे असे मला वैयक्तिक वाटले. सेकंड बटालियन फर्स्ट रेजिमेंट बॉम्बे नेटीव्ह इन्फंट्रीला प्रतिकुल परिस्थितीमध्ये युध्द जिंकणे सोपे नव्हते, तरीही प्राणाची तमा न बाळगता हे अत्यंत अवघड विजय संपादन केला व एक गौरवशाली इतिहास सुवर्ण अक्षरांमध्ये लिहिला गेला. तेंव्हा या लढाईच्या मागे नेमकी प्रेरणा कोणती होती?... हा संगर कशाचा होता?... महार रेजिमेंट नेमके कोणाबरोबर लढले ही लढाई जय पराजयाची होती की, अजुन काही?... ही लढाई महारांच्या अस्तित्वाची व आत्मसन्मानाची होती ?... का चार्तुवर्ण्य व्यवस्थेत बळी पडलेल्या अस्पृश्य दलित

समाजाची होती? असे एक नव्हे अनेक प्रश्न निर्माण होतात. त्यामुळे या बाजुनेही या लढाईचा विचार व्हावा हा प्रामाणिक उद्देश समोर ठेवुन हे संशोधनाचे कार्य हाती घेतले.

“सबार्ल्टन” इतिहास लेखन हा इतिहास लेखनातील अगदी अलिकडचा विचार प्रवाह आहे. युरोपमध्ये ॲन्टिनियो ग्रामची यांनी हा आधुनिक विचारप्रवाह सर्वप्रथम समोर आणली होती. ऑस्ट्रिलियातील विद्यापीठातील भारतीय इतिहास तज्ज्ञ रणजीत गुहा नामक इतिहासकारांनी इतिहासाचे लेखन सबार्ल्टन पध्दतीने व्हावे व इतिहास लेखनामध्ये शोषीतांना, वंचितांना शेतकरी कामगार, सर्व सामान्यांना स्थान दयावे, हा हेतु त्यांनी समोर ठेवला व एक नवीन विचारधारा प्रकाशात आणली तथा प्रचलित केली. “भीमा कोरेगावची लढाईः एक चिकीत्सक अभ्यास” हा संशोधनाचा विषय मुळात याच उद्देशानुसार निवडला गेला आहे. ब्रिटिश राजसत्ता व पेशवाई या दोघांतील जय पराजयाची मालिका नव्हे तर यापेक्षा वेगळया पध्दतीने इतिहासाची मांडणी व्हावी. यासाठी या विषयामध्ये संशोधन करण्यासाठी तत्कालीन कागदपत्रे, पत्रव्यवहार, ब्रिटिश रेसिडेन्सीमधील पत्रव्यवहार तथा कामकाज बखर साहित्य,स्तंभ, त्याच बरोबर अलीकडील काळात विविध संशोधक लेखकांनी लिहिलेले विविध ग्रंथ सामग्री विपुल प्रमाणात प्राप्त होते. Dr.Babasaheb Ambedkar Writing And Speeches, Vol-19, हा ग्रंथ या संशोधनासाठी महत्वपुर्ण आहे. या ग्रंथात आंबेडकरांनी भीमा कोरेगाव याठिकाणी महारांनी गाजवलेल्या शौर्याबद्दल मोठया अभिमानाने स्पष्ट नोंद केली. महार ही जमात लढवय्य आहे..... ते लिहीतात- “आमच्या बापजाद्यांनी शिपाईगिरीच केली आहे, तलवार व बंदूक याखेरीज दुस-या कशास हात लावला नाही. हे सांगावयास नको .आम्ही आता जरी हाती लेखणी धरली आहे तरीसुध्दा आमच्या आयुष्यात तलवार व बंदूक केव्हाच हाती धरली नाही असे नाही.”

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी जे समतेचे लढे सुरु केले ते भीमा कोरेगाव येथील विजय स्तंभास अभिवादन करुनच 1 जानेवारी 1927 पासुन डॉ. आंबेडकरांनी फार मोठया प्रमाणात उर्जा, मनोबल व सामर्थ्य या विजय स्त्ंभापासुन प्राप्त केले, त्यामुळे डॉ. आंबेडकर दरवर्षी 1 जानेवारीला

विजय स्तंभास भेट देतात. ऐवढी सगळी ऐतिहासिक व सामाजिक पार्श्वभुमी असलेली लढाई निश्चितच वेगळा विचार मांडणारी होती. या विषयासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची ग्रंथ संपदा व डॉ. बाबासाहेब आंबेडकर व दलित चळवळ यांच्यावर विपुल प्रमाणात झालेले लेखन महत्वपूर्ण आहे.

2.विषयाची निवड

"भीमा - कोरेगावची लढाई : एक चिकित्सक अभ्यास" हा विषय निवडण्यामागे अनेक कारणे आहेत. त्यामध्ये सर्वात महत्वाचे म्हणजे ही लढाई 500 महार सैनिकांनी बलाढय पेशव्यांच्या 28000 सैनिकांविरुध्द विजय मिळवून महार सैनिकांनी आपले अस्तित्व व आत्मसन्मान कायम राखला. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी या लढाईचा संबंध हा आत्मसन्मानाशी व प्रतिष्ठेशी जोडला. प्रतिवर्षी 1 जानेवारी 1927 पासून डॉ.आंबेडकर हे विजयस्त्ंभास अभिवादन करण्यास जात असत. पेशव्यांच्या –हासास कारणीभूत असलेली भिमा कोरेगावच्या लढाईचा सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक पैलूंवर कोणता परिणाम झाला व महार रेजिमेंटला नेमकी कोणती प्रेरणा होती की अतिशय प्रतिकूल परिस्थितीमध्ये विजय मिळवला. या संदर्भात ऐतिहासिक अभ्यास व्हावा हा उद्देश्य समोर ठेवून हा संशोधन विषय निवडला गेला.

3.संशोधन विषयाची व्याप्ती व मर्यादा

"भीमा - कोरेगावची लढाई : एक चिकित्सक अभ्यास" – या विषयावर संशोधन केले जाणार आहे. कोणत्याही विषयावर संशोधन करत असताना त्यांची व्याप्ती व मर्यादा ठरविणे आवश्यक असते. अन्यथा संशोधन भरकटण्याची शक्यता असते. त्यामुळे विषयाची व्याप्ती ही

पेशवाईच्या स्थापनेपासुन म्हणजेच इस 1740 पासुन प्रस्तुत लढाई आणि लढाई नंतरचे परिणाम अशी असेल. विषयानुरुप आवश्यक तेथे इतर बाबींचा उल्लेख करण्यात येईल.

4.संशोधन पद्धती :

"भीमा - कोरेगावची लढाई : एक चिकित्सकअभ्यास" - या विषयावर संशोधन केला जाणार असुन त्यासाठी ऐतिहासीक संशोधन पद्धती चार प्रकारच्या आहेत,- निवेदनात्मक पद्धती/वर्णनात्मक पद्धती, संदर्भ पद्धती, विश्लेषणात्मक पद्धती आणि मुलभुत संशोधन पध्दती. प्रस्तुत संशोधन विषयासाठी विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात येईल. मिळालेल्या सर्व माहितीची चिकित्सा करत विश्वसनीयतेच्या आधारावर तटस्थ राहुन माहितीचे संकलन करुन निष्कर्ष काढले जातील.

5.संशोधन विषयाची साधने :

"भीमा - कोरेगावची लढाई : एक चिकित्सकअभ्यास"- या शोध प्रबंधासाठी संशोधक प्राथमिक साधनाअंतर्गत तत्कालीन कागदपत्रे, ब्रिटिशांचे महार रेजिमेंट संदर्भीय गौरव पत्रे, ब्रिटिश रेसिडेंन्सी पत्र व्यवहार,भौतिक साधनाअंतर्गत विजय स्तंभ इत्यादी साधनांचा आधार घेतला जाणार आहे व दुस-या साधनाअंतर्गत विविध संदर्भग्रंथ, संकेतस्थळावरील माहिती, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे लेखन व भाषणे, त्यांची वर्तमानपत्रे, लेख, इत्यांदी माहितीचे आकलन करुन हा शोध प्रबंध पुर्ण केला जाईल.

6.संशोधनाची उद्दिष्टये :

1. भीमा कोरेगावची 1 जानेवारी 1818 या लढाईचा सबाल्र्टन विचारधारेनुसार अभ्यास करणे.
2. महार रेजिमेंटने अत्यंत त्वेषाने ही लढाई लढली व अतिशय प्रतिकुल परिस्थितीमध्ये पेशव्यांवर विजय मिळविला याचा अभ्यास करणे.

3. त्रोटक सैन्यांच्या जिवावर ही लढाई लढली. तेंव्हा या महार सैनिकांना नेमकी कोणती प्रेरणा होती व प्रतिकुल परिस्थिती असतांनाही पेशव्यांवर विजय मिळविला याची नेमकी कोणती कारणे आहेत हे शोधुन काढणे.
4. भीमा कोरे गावच्या लढाईचे विषमतावादी तथा अन्यायकारक कारणे याचा अभ्यास करणे.
5. पेशव्यांच्या राजकीय व सामाजिक व्यवस्थेचा अभ्यास करणे.
6. डॉ. आंबेडकरांनी भीमा कोरेगावच्या लढाईचा जो गौरव केला. तेंव्हा नेमकी ही लढाई कशासाठी कोणत्या उद्देश्यासाठी लढली गेली याची कारण मिमांसा करणे त्यामुळे निश्चितच या लढाईचे पुरोगामी परिणाम राजकीय व सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रात झाले याचा अभ्यास करणे.

7.**संशोधन विषयाची गृहीतके** :

1. 1 जानेवारी 1818 भीमा - कोरेगावची लढाई पेशवे व ब्रिटीशांच्या सेकंड बटालीयन फर्स्ट रेजिमेंट बॉम्बे नेटीव्ह इन्फट्री दरम्यान झाली.
2. भीमा - कोरेगावच्या लढाईत महार बटालीयनने पेशव्यांच्या सैन्यांचा पराभव केला व आत्मसन्मानाची लढाई जिंकली.
3. स्मृति आणि पुराणानुसार अस्पृश्यांसंदर्भात पेशव्यांनी आपला राज्यकारभार केला.
4. पेशव्यांची राज्यव्यवस्था चातुवर्ण्य पद्धतीवर विश्वास ठेवणारी होती. पेशवाई काळात अस्पृशांवर अमानवीय अत्याचार केले होते.
5. या लढाईतील महार सैनिकांच्या विजया प्रीत्यर्थ 32 चौरस फुट व 65 फुट उंचीचा दगडी स्तंभ भीमा नदीच्याकाठी कोरेगाव या ठिकाणी बांधला.
6. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आपल्या जीवनभर दरवर्षी 1 जानेवारीला विजय स्तंभास मानवंदना देण्यासाठी जात असत.

7. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना महार सैनिकांच्या विजयाबद्दल अभिमान होता. 1 जानेवारी 1927 रोजी स्मृतिस्तंभास अभिवादन करुन त्यांनी सामाजिक संगराला सुरुवात केली.
8. पेशवा बाजीराव दुसरा याने महार सरदार सिदनाक याला आदेश दिला होता की, पेशवाकाळात महारांना कोणताही मान सन्मान दिला जाणार नाही.
9. पेशवेकालीन व्यवस्थेमध्ये अस्पृश्यांवर झालेल्या अन्यायाबद्दल महार सैनिकांच्या मध्ये प्रचंड चिड निर्माण झाली होती.
10. पुर्व जांनी गाजवलेल्या मर्दुमकीमुळे सद्यघडीला महारामध्ये विशेषता बौध्द समाजामध्ये प्रचंड उर्जा व प्रेरणा विजय स्तंभामुळे प्राप्त होते.

8. प्रकरण सुची

प्रकरण 1 ले : पेशवाईची स्थापना व राज्यव्यवस्था

1.1 पेशवाईचा संस्थापक व संक्षिप्त कारकीर्द

1.2 पेशव्यांचा राज्यकारभार व शिक्षणपध्दती

1.3 पेशव्यांचा राज्यकारभार व न्यायपध्दती

1.4 पेशव्यांच्या काळातील लष्करी स्थिती

1.5 पेशवा काळातील मराठा सरदारांचे कामगिरी

1.6 पेशवाकालीन सामाजिक स्थिती व अस्पृश्यांचे स्थान

प्रकरण 2 रे : खडर्याची लढाई इस 1795

2.1 पार्श्वभुमी

2.2 खडर्यांच्या लढाईतील पेशवा व निजाम बलस्थाने

2.3 खडर्यांच्या लढाईतील महार सरदार सिदनाकची कामगिरी

2.4 खडर्यांची लढाई प्रत्यक्ष वृतांत व त्याचे परिणाम

प्रकरण 3 रे : महारांचे लष्करी योगदान

3.1 महार रेजिमेंटची पार्श्वभुमी

3.2 पेशवाई विरुद्ध महारांचे बंड

3.3 महार सैनिकांना अस्पृश्यतेची वागणुक

प्रकरण 4 थे : भीमा - कोरेगावची लढाई

4.1 लढाईची पार्श्वभुमी

4.2 भीमा - कोरेगावची लढाई व पेशव्यांची राजनिती

4.3 बाजीराव पेशवा दुस-याकडे महार सेनापतीच्या अस्मितेच्या मागण्या

4.4 लढाईची कारणे

4.5 प्रत्यक्ष लढाई व महारांचे शौर्य

4.6 लढाईचे परिणाम

प्रकरण 5 वे : पेशवाईचा -हास

5.1 पेशव्यांच्या -हासाचे कारणीभुत घटक

5.1.1 चातुवर्ण्य व्यवस्था

5.1.2 सामाजिक विषमता

5.1.3 राजकीय विषमता

5.1.4 पेशव्यांचा महार रेजिमेंटच्या मर्दुमकी बद्दल गैरसमज

5.2 महार रेजिमेंटची राजकीय व सामाजिक अस्मितेसाठी लढाई

5.3 महार रेजिमेंटची अंतरस्थ प्रेरणा

5.3.1. पराकोटीची अस्पृश्यता

5.3.2 छत्रपतीचे स्वराज्य बुडवण्याची भावना

5.3.3 छत्रपती संभाजी महाराजांची हत्या व त्यांच्या देहाची विटंबना

प्रकरण 6 वे : उपसंहार

वरील प्रकरण सुचीनुसार संशोधन विषयाची प्रस्तावित मांडणी सारांश रुपाने पुढील प्रमाणे असेल

प्रकरण 1 ले : पेशवाईची स्थापना व राज्यव्यवस्था

या प्रकरणामध्ये पेशवाईची स्थापना व राज्यव्यवस्थेचा आढावा घेण्यात येईल आठराव्या शतकात बाळाजी विश्वनाथ या चित्पावन ब्राम्हणाने पेशवाई मराठी सत्तेच्या केंद्र स्थानी आणली. मराठा शाहीतील सर्व कारभार आपल्या हाती घेवुन राज्यकारभाराचे पुणे हे प्रमुख केंद्र बनले. व त्यानंतरचे छत्रपती हे केवळ नामधारी राहिले. संपुर्ण सत्ता आपल्या हाती घेवुन बाळाजी विश्वनाथानंतरच्या पेशव्यांनी मराठा सरदाराच्या सहायाने मराठा साम्राज्याचे झेंडे अटकेपार लावले. पेशव्याच्या राज्यकारभारामधील शिक्षण व्यवस्था, न्यायव्यवस्था व लष्करी स्थिती तसेच पेशवे काळातील मराठा सरदारांची कामगिरी इत्यादी आढावा घेतला जाणार आहे.

पेशवेकालीन सामाजिक स्थिती यामध्ये पेशव्यांनी राज्यकारभारात अस्पश्यांना कायमचे हद्दपार केले होते. अस्पृश्यांवर अन्याय अत्याचार हे वाढलेले होते. त्यामुळे अस्पृश्य समाजात पुरता हतबल झालेला होता. पेशवे काळातील अस्पृश्यांचे स्थान काय असेल असे बाजीराव दुसरा यास विचारले असता अस्पृश्यांना सुईच्या टोकावर जेवढा धुळीचा कण असेल तितकाही मान मिळणार नाही असे सांगितले.

प्रकरण 2 **रे : इस** 1795 **खडर्याची लढाई**

पेशव्यांनी आपला साम्राज्य विस्तार केला तेंव्हा त्यांनी ब-याच लढाया लढवल्या या लढायांमध्ये मराठा सरदारांनी साजेशी कामगिरी केली व साम्राज्य विस्तार घडुन आणला. 11 मार्च 1795 ची खडर्याच्या लढाईत बाजीराव पेशव्यांच्या फौजेत सिदनाक नावाचा महार सरदार होता. त्याने खडर्याच्या लढाईत मर्दुमकी गाजवुन ही लढाई स्वबळावर पेशव्यांना जिंकुन दिली व या लढाईत निजामाच्या फौजेचा पराभव केला. खडर्याच्या रणांगणावर जेंव्हा फौजेचे तळ पडले तेंव्हा सिदनाक सरदारही आपले महार लष्करी पथक घेवुन रणांगणावर हजर झाला. तेंव्हा त्याचा तिरस्कार करण्यात येवुन आपली राहुटी इतर सैनिकांच्या खुप दुर मांडली. खडर्याच्या लढाईत जेंव्हा परशुरामभाऊ पटवर्धन या सरदारांवर पठाणाच्या टोळीने आक्रमण केले तेंव्हा पटवर्धनाच्या जिवीताचे रक्षण करुन पठाणांचा निःपात केला. ऐवढा मोठा विजय संपादन करुन केवळ हलक्या व हिन जातीचे म्हणुन जुजबी मदत केली. वास्तवीक पाहता विजयश्री संपादन करणारे सरदाराचा फार मोठा मानसन्मान करायला हवा होता. परंतु, चातुवर्ण्य व्यवस्थेनुसार पेशव्यांचा राज्यकारभार चालत असल्यामुळे अतिशय हिन वागणुक अस्पृश्यांना प्राप्त होत असे.

प्रकरण 3 **रे :** महारांचे लष्करी योगदान

महारांची लष्करी तथा सैनिकी योगदान जर पाहिले तर हिंदवी स्वराज्याचे जनक ज्यांनी मराठयांचे साम्राज्य निर्माण केले ते छत्रपती शिवाजी महाराज यांनी सर्वजाती धर्मातील लोकांना सोबत घेवुन स्वराज्याची मुहर्त मेढ रोवली व अस्पृश्य समाजल्या जाणा-या महारांची देखील

आपल्या सैन्यात भरती केली. गडांच्या संरक्षणाची जबाबदारी निष्ठेणे करुन वेळ प्रसंगी प्राणाची आहुती देणा-या महारांकडे सोपवले. गडाच्या भवताली महार सैनिक हे नित्य नियमाणे ठेवल्या जायचे परंतु, मराठयाच्या साम्राज्याची धुरा जेंव्हा पेशव्यांकडे आली आणि पेशवाईस सुरुवात झाली. त्यावेळेस याच अस्पृश्यांना चातुवर्ण्य व्यवस्थेमुळे हद्ददपार केले व समतेचे, मानवतेचे हक्क नाकारले. अस्पृश्यांवर पराकोटीचा अन्याय केला अस्पृश्यांच्या सावलीनेही विटाळ होवु लागला. अस्पृश्यांची थुंकी रस्त्यावर पडु नये म्हणुन गळयात मडके, पाउल खुणा पुसल्या जाव्यात म्हणुन कंबरेला झाडु बांधल्या गेले. या अन्यायामुळे अस्पृश्यांचा आत्मसन्मान दुखावला गेला व पेशव्यांच्या विरोधामध्ये लढण्याची व आपले हक्क झगडून संघर्ष करून मिळवून घेण्याची भूमिका बनली. त्यामूळे सरदार सिदनाक भीमा - कोरेगावच्या लढाईपूर्वी बाजीराव पेशवे दुसरा यास म्हणाला की ब्रिटिशांचे आक्रमण आम्ही परतवून यशस्वीपणे लावू त्याबदल्यात आम्हास आपल्या राज्यात कोणती जागा असेल तेव्हा उर्मट पेशव्यांनी महारांचे शौर्य नाकारले व स्पष्टपणे सांगितले की सुईच्या अग्रावर असलेल्या धुळीच्या कणाइतकीही तुम्हाला जागा मिळणार नाही. तेव्हा सिदनाक सरदार हा देखील ब्रिटीशांच्या सोबत पेशव्यांच्या विरोधात लढण्यास तयार झाला व आपले निवडक पन्नास सैनिक घेवून ब्रिटीश सेनापती कॅप्टन फ्रांन्सिस स्टॉटन ला भेटावयास गेला.

प्रकरण 4 **थे : भीमा - कोरेगावची लढाई**

याप्रकरणामध्ये भीमा - कोरेगावच्या युध्दाची पार्श्वभूमी विषद करण्यात येईल. प्रत्यक्ष युध्द व युध्द परिणाम यांचे विवेचन करण्यात येईल. बाजीराव पेशवा जेव्हा प्रचंड मोठी फौज घेवून पुण्याच्या दिशेने निघाला तेव्हा ब्रिटीश सेनापती कॅप्टन फ्रांन्सिस स्टॉटन आपल्या फौजेची चाचपणी केली व पेशव्यांना मात देण्यासाठी ब्रिटीश फौजेतील सेकंड बटालीयन फर्स्ट रेजिमेंट बॉम्बे नेटीव्ह इन्फट्री ची निवड केली. निवडक अशा 500 महार सैनिकांना लढाईचा आदेश दिला. कित्येक मैल प्रवास करून न थकता, न दमता उपाशी पोटी 31 डिसेंबर 1817 रोजी भीमा - कोरेगाव या ठिकाणी दोन्ही सैन्यांची भेट झाली. प्रत्यक्ष युध्दास 1 जानेवारी 1818 ला सकळी ९.00 वाजता सुरुवात

झाली. अतिशय प्रतिकूल परिस्थीतीमध्ये महार सैनिकांनी कुठलीही उसंत न घेता पेशव्यांच्या सैन्यांचा प्रतिकार केला. 28000 पेशवा सैन्य विरुध्द 500 महार रेजिमेंट चे सैनिक उभयतांमध्ये तुंबळ लढाई झाली.व या युध्दात 28000 पेशव्यांच्या सैन्यांचा पराभव केला.अतिशय प्रतिकूल परिस्थितीमध्ये महारांनी लढलेली लढाई ही आत्मसन्मानासाठी, स्वाभीमानासाठी लढली. चातुर्वर्ण्य व्यवस्थेवर हा महार रेजिमेंटचा जबरदस्त प्रहार होता.

या लढाईची परिणीती पेशवाईच्या अस्तात झाली. पेशवाई नष्ट होवून ब्रिटीशांची सत्ता मुंबई प्रांतावर सुरु झाली.ब्रिटीशांनी महार शुरांचा गौरव केला व त्यांच्या शौर्याच्या प्रित्यर्थ विजयस्तंभ भीमा - कोरेगाव येथे भीमा नदीकाठी युध्दभूमीवर बांधला.

प्रकरण 5 वे : पेशवाईचा -हास

पेशव्यांचे साम्राज्य नष्ट झाले. पेशव्यांच्या -हासास महत्वपूर्ण घटक कारणीभूत ठरले, त्यामध्ये सर्वात महत्वाचा घटक म्हणजे पेशव्यांची राज्यव्यवस्था चातुर्वर्ण्य व्यवस्थेवर आधारित होती. त्यामूळे स्वतःच्या राज्यातील दलित, अस्पृश्य समाज दुरावला गेला होता. कमालीची सामाजिक विषमता निर्माण झालेली होती. महारांना, अस्पृश्यांना पेशवांनी पशुसमान वागविले होते, त्यामूळे या लढाईच्या निमित्ताने महार रेजिमेंटने आत्मसन्मानासाठी स्वकीय सत्तेचा विरोध करून पराभव केला. ज्या छत्रपतींनी मराठा साम्राज्य निर्माण केले त्याच मराठा साम्राज्यातील समानता, माणुसकी,बंधुभाव पेशव्यांनी धुळीस मिळवला व नैतिक अधःपतन करून अन्याय, अत्याचार वाढवला त्यामूळे प्रचंड राग अस्पृश्यांच्या मनात निर्माण होवून पेशवाई या लढाईमुळे हद्दपार केली.

प्रकरण 6 वे : उपसंहार

या प्रकरणामध्ये वरील पाच प्रकरणांचा आढावा घेवून विविध संशोधक, विद्वानांची , इतिहासकारांची मते लक्षात घेवून उपलब्ध साधनांच्या आधारे प्रस्तुत प्रकरणात वस्तुनिष्ठ निष्कर्ष

काढुन "भीमा – कोरेगावची लढाई : एक चिकित्सक अभ्यास" हा सबाल्टर्न विचार प्रवाहानुसार इतिहास लेखनातील रिक्तता भरून काढण्याचा एक प्रामाणिक प्रयत्न आहे.

9.संदर्भग्रंथसूची :

1. अलेक्झांडर राबर्टसन (अनुवाद,भिक्षु सिवली बोधी)"**महारलोक**" **नागपूर**, **सुगम प्रकाशन** 1991
2. Dr.Babasaheb Ambedkar Writing and speeches vol-1 Govt of Maharashtra - 1979
3. Dr.Babasaheb Ambedkar Writing & Speeches. Vol.-19 Govt of Maharashtra
4. रामचंद्र नारायण लाड (अनुवाद- प्रा.मा.म.देशमुख) – मराठयांचे दासीपुत्र,शिवभारत प्रकाशन, 2000
5. चां.भ.खैरमोडे – डॉ.भिमराव रामजी आंबेडकर चरित्रग्रंथ खंड -1, पुणे, सुगावा प्रकाशन-1991
6. डॉ.भवरे ना.गो. – पेशवेकालीन दलित समाज,पुणे,भा.इ.सं.मं.
7. चां.भ.खैरमोडे – अस्पृश्यांचा लष्करी पेशा,मुंबई,महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृतीमंडळ,1992
8. डॉ.बाबासाहेब आंबेडकर – (अनु.- चां.भ.खैरमोडे) शूद्र पूर्वी कोण होते ? - कौशल्या प्रकाशन, 2011
9. डॉ.गवळी पी.ए. – पेशवेकालीन समाज व जातीय संघर्ष

10. डॉ.अनिल कठारे – शिवकाळ व पेशवाईतील महारांचा लष्करी इतिहास,पुनम प्रकाशन-2011
11. प्रा.सा.द. सोनसळे-भीमा कोरेगावची शौर्यगाथा, सुमेध प्रकाशन-2007
12. सूर्यकांत भगत- भीमा – कोरेगाव लढाई आणि महारांच्या लष्करी सेवेचा इतिहास,उत्कर्ष प्रकाशन-2015
13. आतुरकर रा.वि. (संपा) – पेशवेकालीन सामाजिक आणि आर्थिक पत्रव्यवहार, पुणे, भा.इ.सं.भं. 1950
14. पठाण यु.म. (संपा) सभासद बखर,समर्थ प्रकाशन, 1974
15. Leut.G.S.P. Thorat – The Regimental History of The Mahar, M.G.Regiment
16. Leut.Gen.Sir George Macman – The Martial Race of India
17. वि.तु.जाधव – महाराष्ट्राचा महार
18. प्रा.मा.म.देशमुख - शिवशाही
19. दिक्षित आवळे – नागवंशीय आंबेडकरी चळवळीत महारांचे योगदान, पारमिता प्रकाशन-1998
20. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची वृत्तपत्रे – जनता, प्रबुध्द भारत, मूकनायक इत्यादी.

संशोधक विद्यार्थी
सिध्दार्थ विठठलराव मस्के
(एम.ए., बी.एड., सेट)
मो. 9420792342

मार्गदर्शक
डॉ.यु.सी.राठोड
संशोधन मार्गदर्शक व इतिहास विभाग प्रमुख
नुतन महाविद्यालय,सेलू
जिल्हा परभणी